# दुचाकी चोरटा पोलीस स्टेशन हिंगणघाट येथील गुन्हे प्रकटीकरण पथकाचे जाळ्यात

दि.२२.०४.२०२२ रोजी फिर्यादी श्री राहुल कामडी, रा. गणेशपुर, हिंगणघाट यांनी त्यांचे मालकीची होंडा कंपनीची सि.बी. व्टिस्टर मोटारसायकल क्र. एमएच-३२/यु-७५४७ ही दुकानाचे बाहेर उभी करुन दुकानात गेले दिवसभर दुकानात काम करुन रात्री १९.०० वा. दरम्यान घरी जाण्याकरीता दुकानाचे बाहेर निघाले असता त्यांनी दुकानाचे बाहेर ठेवलेली त्यांची वरील मोटारसायकल दिसुन आली नाही. सदर मोटारसायकलचा आजूबाजूला शोध घेतला असता मिळून न आल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन हिंगणघाट येथे अप.क्र. ४९०/२०२२ कलम ३७९ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याची तात्काळ दखल घेवून गुप्त बातमीदार लावण्यात आले असता गुप्त बातमीदार यांचेकडुन प्राप्त खात्रीशीर माहितीचे आधारे आरोपी अमोल प्रभाकर पुलकंठवार, वय २९ वर्ष, रा. सेन्ट्रल वार्ड, हिंगणघाट यास ताब्यात घेवुन त्यास गुन्ह्यासंबंधाने विचारपूस केली असता त्याने सदर गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्याचे ताब्यातुन गुन्ह्यातील चोरीस गेलेली होंडा कंपनीची सि.बी. व्टिस्टर मोटारसायकल क्र. एमएच-३२/ यु-७५४७ कि.२०,०००/- रु. ची हस्तगत करण्यात आली. तसेच नमूद आरोपीस पो.स्टे. अभिलेखावरील दाखल असलेल्या मोटारसायकल चोरी बाबत आणखी सखोल विचारपूस करण्यात आली असता त्याने आणखी एक मोटर सायकल चोरली असल्याची माहिती दिल्याने त्याचे ताब्यातुन पो.स्टे. हिंगणघाट अप.क्र. ४९४/२०२२ कलम ३७९ भा.दं.वि. मधील एक स्प्लेंडर मोटर सायकल क्रमांक एमएच-३२/एए-२५८० कि.२०,०००/- रु. ची हस्तगत करुन वर नमूद २ गुन्हे उघडकीस आणले.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत होळकर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. यशवंत सोळंके, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, हिंगणघाट श्री. दिनेश कदम यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. संपत चव्हाण यांचे निर्देशाप्रमाणे पोलीस अंमलदार शेखर डोंगरे, निलेश तेलरांधे, सचिन घेवंदे, सचिन भारशंकर, विशाल बंगाले सर्व नेमणुक पोलीस स्टेशन हिंगणघाट यांनी केली.